**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे अधिकार प्रदान करण्याबाबत**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७ /रोहयो-१०
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ८ जून,२०१०

संदर्भ :
१) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५.
२) राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम मार्गदर्शक पुस्तिका २००६.
३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००५/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक २३ डिसेंबर, २००५.
४) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१/ रोहयो-१०, दिनांक २ ऑगस्ट, २००६.
५) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/ प्र.क्र.१०४/ रोहयो-१०, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.
६) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक १४ ऑगस्ट, २००७.
७) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक-रोहयो २००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक २३ ऑगस्ट, २००७.
८) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक २७ डिसेंबर, २००७.
९) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक २८ डिसेंबर, २००७.
१०) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक ७ जानेवारी, २००८.
११) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :रोहयो-२००७/प्र.क्र.२४/रोहयो-१०, दिनांक ७ फेब्रुवारी, २००८.
१२) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००८/ प्र.क्र.७१/ रोहयो-१०, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८.
१३) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००९/ प्र.क्र.५८/ मग्रारोहयो-१०, दिनांक २७ मे, २००९.

**प्रस्तावना-** महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अधिनियम २००५ अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीत सुधारणा करणे, तसेच सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे, केंद्रिय निधीचा पर्याप्त वापर करणे, सध्याच्या व्यवस्थेतील दोष दूर करणे व आवश्यक असल्यास धोरणात्मक



रोटा/एच-११६६[१५००-६-२०१०]-१

बदल करणे, त्याबाबत सूचना करण्याकरीता दिनांक ४ मार्च २०१० च्या आदेशान्वये मंत्रिमंडळाची उप समिती गठीत करण्यात आली होती.

२. सदर मंत्रिमंडळ उपसमितीने ज्या शिफारशी केल्या होत्या त्यावर निर्णय घेण्याकरिता मंत्रिमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. दिनांक १२ मे, २०१० रोजी झालेल्या बैठकीमध्ये शासनाने मग्रारोहयोच्या कामासाठी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन सदर अधिकार तालुका स्तरावर देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आता शासन प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याबाबतचे यापूर्वीचे सर्व आदेश अधिक्रमित करुन पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

**<u>शासन निर्णय :-</u>**

१. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्याचे जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे असलेले सर्व अधिकार आता अनुक्रमे तहसीलदार आणि गट विकास अधिकारी यांना देण्यात येत आहेत.

२. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामपंचायतीच्या कामाकरिता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार पंचायत समितीच्या अभियंत्यास देण्यात येत आहेत. तसेच यंत्रणांच्या कामाकरिता तांत्रिक मान्यता देण्याचे पूर्ण अधिकार संबंधित खात्याचे तांत्रिक अधिका-यास (उदा. अभियंता) देण्यात येत आहेत. त्यावर सनियंत्रण ठेवण्यासाठी तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि संबंधित उप अभियंता अथवा तांत्रिक अधिकारी यांची एक समिती राहील.

३. यापूर्वी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देताना ज्या प्रकारच्या नोंदवहया ठेवल्या जात होत्या त्या सर्व प्रकारच्या नोंदवहया तालुका स्तरावर प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देताना ठेवण्यात याव्यात तसेच एकच काम दोन किंवा अधिक यंत्रणाकडून घेतले जाऊ नये याची दक्षता घेण्याकरिता संदर्भाधीन क्र. १३ येथील दिनांक २७ मे, २००९ च्या आदेशान्वये विहित केलेली ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याबाबतची कार्यपध्दती अवलंबिली जाईल याची दक्षता घेण्यात यावी.

४. सदर आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २२४/१०/व्यय-८, दि.२ जून,२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१००६०८१३४४५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( बा.का.नारायणकर )
उप सचिव (रोहयो)

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
४) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
५) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
७) विभागीय आयुक्त, कोकण, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर, पुणे.
१७) प्रधान मुख्य वन संरक्षक , महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१८) आयुक्त, (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९) सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२१) सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो).
२२) सर्व तहसिलदार,
२३) सर्व गट विकास अधिकारी,
२४) मुख्य अभियंता, ल.पा. (स्था.स्तर) पुणे,
२५) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२६) समिती अधिकारी, कार्यासन ड-७, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
२७) सर्व उपसचिव, अवर सचिव व कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग),
२८) कक्ष अधिकारी, वित्त विभाग /व्यय ८ शाखा, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
२९) कक्ष अधिकारी, रोहयो -१, सारसंग्रह,
३०) निवडनस्ती, रोहयो-१०.

---------